338/5115 पावती Original/Duplicate

Tuesday,April 16 ,2019 नोंदणी क्रं. :39म

1:02 PM Regn.:39M

पावती क्रं.: 5672 दिनांक: 16/04/2019

गावाचे नाव: टिटवाळा

दस्तऐवजाचा अनुक्रमांक: कलन4-5115-2019

दस्तऐवजाचा प्रकार : कुलमुखत्यारपत्र

सादर करणाऱ्याचे नाव: मे. साई गणेश एंटरप्रायझेस तर्फे भागीदार श्री. मिलिंद जगन्नाथ वाळेकर

नोंदणी फी	रु. 100.00
दस्त हाताळणी फी	रु. 400.00
पृष्ठांची संख्या: 20	
एकूण:	रु. 500.00

आपणास मूळ दस्त ,थंबनेल प्रिंट,सूची-२ अंदाजे
1:28 PM ह्या वेळेस मिळेल.

Joint Sub Registrar Kalyan 4
सह-दुय्यम निबंधक कल्याण ४

बाजार मुल्य: रु.1 /-

मोबदला रु.0/-

भरलेले मुद्रांक शुल्क : रु. 500/-

1) देयकाचा प्रकार: eChallan रक्कम: रु.100/-
डीडी/धनादेश/पे ऑर्डर क्रमांक: MH000444546201920E दिनांक: 12/04/2019
बँकेचे नाव व पत्ता:
2) देयकाचा प्रकार: DHC रक्कम: रु.400/-
डीडी/धनादेश/पे ऑर्डर क्रमांक: 1504201912633 दिनांक: 15/04/2019
बँकेचे नाव व पत्ता:

कलन - ४
दस्त क्र. ५१९५ /१९
९/२०

CHALLAN
MTR Form Number-6

GRN	MH000444546201920E	BARCODE		Date	12/04/2019-17:08:17	Form ID	48(f)

Department	Inspector General Of Registration	**Payer Details**	
Type of Payment	Stamp Duty Registration Fee	**TAX ID (If Any)**	
		PAN No.(If Applicable)	ACGFS5266E
Office Name	KLN3_KALYAN NO 3 JOINT SUB REGISTRA	**Full Name**	SAI GANESH ENTERPRISES
Location	THANE		
Year	2019-2020 One Time	**Flat/Block No. Premises/Building**	S.NO.353, VILLAGE TITWALA,

Account Head Details	Amount In Rs.
0030046401 Stamp Duty	500.00
0030063301 Registration Fee	100.00
Total	600.00

Road/Street	TAL. KALYAN, DIST. THANE,
Area/Locality	TITWALA
Town/City/District	
PIN	4 2 1 6 0 5
Remarks (If Any)	PAN2=AEFPL4923E~SecondPartyName=ROHINI P LELE~CA=0~Marketval=0
Amount In Words	Six Hundred Rupees Only

DEFACED ₹600.00 DEFACED

Payment Details	IDBI BANK	FOR USE IN RECEIVING BANK			
Cheque-DD Details		Bank CIN	Ref. No.	69103332019041215074	210781440
Cheque/DD No.		Bank Date	RBI Date	12/04/2019-17:09:23	15/04/2019
Name of Bank		Bank-Branch		IDBI BANK	
Name of Branch		Scroll No. , Date		100 , 15/04/2019	

Department ID :
NOTE:- This challan is valid for document to be registered in Sub Registrar office only. Not valid for unregistered document. Mobile No. : 9769825991
सदर चलन केवल दुय्यम निबंधक कार्यालयात नोदंणी करावयाच्या दस्तांसाठी लागु आहे. नोदंणी न करावयाच्या दस्तांसाठी सदर चलन लागु नाही.

Validity unknown
Digitally signed by DS VIRTUAL TREASURY MUMBAI 02
Date: 2019.04.16 13:04:15 IST
Reason: Secure Document
Location: India

Challan Defaced Details

Sr. No.		Defacement No.	Defacement Date	UserId	Defacement Amount
1	(iS)-338-5115	0000307204201920	16/04/2019-13:02:47	IGR127	100.00
2	(iS)-338-5115	0000307204201920	16/04/2019-13:02:47	IGR127	500.00
			Total Defacement Amount		**600.00**

Print Date 16-04-2019 01:04:15

क ल न – ४
दस्त क्र. ५११५ /१९
२/२०

Document **H**andling **C**ha₹ges
Inspector General of Registration & Stamps

Receipt of Document Handling Charges

PRN	1504201912633	Receipt Date	16/04/2019

Received from Joint SR Kalyan, Mobile number 9821314004, an amount of Rs.400/-, towards Document Handling Charges for the Document to be registered on Document No. 5115 dated 16/04/2019 at the Sub Registrar office Joint S.R.Kalyan 4 of the District Thane.

DEFACED
₹ 400
DEFACED

Payment Details

Bank Name	IBKL	Payment Date	15/04/2019
Bank CIN	10004152019041510711	REF No.	211119767
Deface No	1504201912633D	Deface Date	16/04/2019

This is computer generated receipt, hence no signature is required.

THE SEAL OF THE JOINT SUB REGISTRAR सह दुय्यम निबंधक कल्याण-४ KALYAN-4 जि. ठाणे Dist. Thane

Department of Stamp & Registration, Maharashtra	
Receipt of Document Handling Charges	
PRN 1504201912633	**Date** 15/04/2019

क ल न – ४
दस्त क्र. ५९९५ /१९
3/20

Received from Joint SR Kalyan, Mobile number 9821314004, an amount of Rs.400/-, towards Document Handling Charges for the Document to be registered(iSARITA) in the Sub Registrar office Joint S.R.Kalyan 4 of the District Thane.

Payment Details

Bank Name	IBKL	**Date**	15/04/2019
Bank CIN	10004152019041510711	**REF No.**	211119767

This is computer generated receipt, hence no signature is required.

THE SEAL OF THE JOINT SUB REGISTRAR KALYAN
सह दुय्यम निबंधक कल्याण-४ यांची मुद्रा
जि.ठाणे
Dist. Thane

CHALLAN
MTR Form Number-6

GRN	MH000444546201920E	BARCODE		Date	12/04/2019-17:08:17	Form ID	48(f)

Department	Inspector General Of Registration	Payer Details	
Type of Payment	Stamp Duty Registration Fee	TAX ID (If Any)	
		PAN No.(If Applicable)	ACGFS5266E
Office Name	KLN3_KALYAN NO 3 JOINT SUB REGISTRA	Full Name	SAI GANESH ENTERPRISES
Location	THANE		
Year	2019-2020 One Time	Flat/Block No.	S.NO.353, VILLAGE TITWALA,
		Premises/Building	
		Road/Street	TAL. KALYAN, DIST. THANE,
		Area/Locality	TITWALA
		Town/City/District	
		PIN	4 2 1 6 0 5

कलम - ४
दस्त क्र. ५९९५/१९
२०/२०

Account Head Details	Amount In Rs.
0030046401 Stamp Duty	500.00
0030063301 Registration Fee	100.00
Total	600.00

Remarks (If Any)

PAN2=AEFPL4923E~SecondPartyName=ROHINI P

LELE~CA=0~Marketval=0

Amount In Words Six Hundred Rupees Only

Payment Details	IDBI BANK	FOR USE IN RECEIVING BANK			
Cheque-DD Details		Bank CIN	Ref. No.	91033320190412150 74	210781440
Cheque/DD No.		Bank Date	RBI Date	12/04/2019-17:09:23	Not Verified with RBI
Name of Bank		Bank-Branch		IDBI BANK	
Name of Branch		Scroll No. , Date		Not Verified with Scroll	

Department ID : Mobile No. : 9769825991

NOTE:- This challan is valid for document to be registered in Sub Registrar office only. Not valid for unregistered document.

सदर चलन केवल दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणी करावयाच्या दस्तासाठी लागु आहे. नोंदणी न करावयाच्या दस्तासाठी सदर चलन लागु नाही.

सो.सोहेल शकील शेख

THE SEAL OF THE JOINT SUB REGISTRAR दुय्यम निबंधक कल्याण-३ ठाणे क्र. ३ वि. ठाणे Dist. Thane

Print Date 12-04-2019 05:09:29

क ल न - ४
दस्त क्र. ५११५ /१९
५ पा



क ल न – ४
दस्त क्र. ५११५ /१९
९/20

कधीही संपूष्टात न येणारे कुलमुखत्यारपत्र

कधीही संपूष्टात न येणारे कुलमुखत्यारपत्र आज **दि.१६/०४/२०१९** रोजी **डोंबिवली** येथे लिहून दिले.

(१) सौ. रोहिणी प्रकाश लेले, वय ६४ वर्ष, व्यवसाय गृहीणी, **(२) श्री. प्रकाश गोविंद लेले**, वय ७२ वर्ष, व्यवसाय निवृत्त, दोघेही राहणार २०४, मृण्मयी सोसा., सिद्धेश्वर लेन, परनाका, अपेक्स हॉस्पीटल जवळ, कल्याण (पश्चिम)-४२१३०१, **(३) सौ. रश्मी अमोद गोरे (पूर्वाश्रमीची रश्मी प्रकाश लेले)**, वय ३८ वर्ष, व्यवसाय नोकरी, राहणार ६०३, ओरकीड बिल्डिंग नं.६, हाईलॅन्ड रेसिडेन्सी, कोलशेत रोड, ढोकाळी, ठाणे, ज्यांना यापुढे सोईसाठी **"मिळकत मालक/लिहून देणार/प्रथम पक्ष"** असे संबोधण्यात आले आहे (ज्या संज्ञेत त्यांचे सर्व वालीवारस, कुळवहिवाट्दार, हिस्सेदार, मुखत्यार व मृत्यूपत्र व्यवस्थापक यांचा समावेश होईल);

आणि

मे. साई गणेश एंटरप्रायझेस, भागीदारी संस्था, पत्ता ए/९, बाळकृष्ण अपार्टमेंट, घनश्याम गुप्ते रोड, डोंबिवली (प)-४२१२०२, तर्फे भागीदार **(१) श्री. मिलिंद जगन्नाथ वाळेकर**, वय ५४ वर्ष, व्यवसाय धंदा, **(२) श्री. सुरेश शांताराम म्हात्रे**, वय ५३ वर्ष, व्यवसाय धंदा, **(३) श्री. भावेश जयंतीलाल पटेल**, वय ३६ वर्ष, व्यवसाय धंदा, ज्यांना यापुढे सोईसाठी **"विकासक/लिहून घेणार/दूसरे पक्ष"** असे संबोधण्यात आले आहे (ज्या संज्ञेत संस्थेचे सर्व भागीदार व त्यांचे वालीवारस, हिस्सेदार, मुखत्यार व व्यवस्थापक यांचा समावेश होईल);

ज्याअर्थी दि.१६/०४/२०१९ रोजीच्या व सह-दुय्यम निबंधक, कल्याण-४, यांचे कार्यालयात दि.१६/०४/२०१९ रोजी दस्त नं.५११३/२०१९, अन्वये नोंदणीकृत विकास करारान्वये लिहून देणार यांनी त्यांच्या मालकीची व कब्जेवहिवाटीची तुकडी जिल्हा ठाणे, पोटतुकडी तालुका कल्याण, येथील कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीतील, तसेच दुय्यम निबंधक कल्याण यांचे स्थळसिमेतील, **मौजे टिटवाळा, स.नं.३५३ [जुना स.नं.१८७/१ ते १० + १९०/११ पै, प्लॉट नं.८५], क्षेत्र ३१२ चौ.मी.**, व खालील **"मिळकतीचे परिशिष्ट"** मध्ये जिचे विस्तृत वर्णन केले आहे, अशी जमीन मिळकत, ह्यातील विकासक यांना विकसीत करण्यास दिली आहे (ज्यांना येथुन पुढे **"सदर विकास करार"** व **"सदर मिळकत"** असे संबोधले जाईल);

क ल न – ४
दस्त क्र. ५७९५ /१९
७/२०

आणि ज्याअर्थी सदर विकास कराराच्या अनुषंगाने सरकारी, निमसरकारी कार्यालयातून वेगवेगळ्या संमत्या, परवानग्या मिळविण्यासाठी व सदर मिळकत लिहून घेणार यांना योग्यरित्या विकसीत करता यावी म्हणून लिहून देणार यांनी सदर विकास कराराच्या अटी व शर्तींप्रमाणे लिहून घेणार यांचे लाभात सदरचे कधीही संपूष्टात न येणारे कुलमुखत्यारपत्र लिहून देण्याचे ठरवले;

त्याअर्थी लिहून देणार यांनी आज रोजी सदर कधीही संपुष्टात न येणा-या कुलमुखत्यार पत्रान्वये लिहून घेणार यांना लिहून देणार यांच्यातर्फे खालील सर्व कामे करण्यासाठी मुखत्यारी म्हणून नेमलेले आहे व तसा अधिकार लिहून देणार यांनी त्यांना दिलेला आहे. लिहून देणार यांचे मुखत्यारी म्हणून करावयाची सर्व कामे लिहून घेणार ह्या भागीदारी संस्थेच्या भागीदारांपैकी कोणत्याही एका भागीदारास करता येईल व ते संपूर्णपणे कायदेशीर समजले जाईल. लिहून देणार यांचे मुखत्यारी म्हणून लिहून घेणार यांनी जी कामे करावयाची आहेत ती येणेप्रमाणे:-

१. कल्याण डोंबिवली महानगरपालिका अथवा सक्षम प्राधिकारी व त्यांची संबधीत कार्यालये तसेच टाऊन प्लॅनिंग कार्यालय यांचेकडे आवश्यक त्या परवानग्या म्हणजेच बांधकाम परवानगी, इमारतीचा नकाशा, आय.ओ.डी. प्रमाणपत्र, बांधकाम पूर्णतेचा दाखला इ. साठी अर्ज करणे फ़ॉर्म भरणे, कागदपत्रे दाखल करणे, प्रतिज्ञापत्र करणे, जाब जबाब देणे, तसेच त्यांचाशी पत्रव्यवहार करणे व आवश्यक त्या सर्व परवानग्या मिळविणे.

२. बांधकाम परवानगी व संमत नकाशाचे नुतनीकरण करून घेणे कल्याण डोंबिवली महानगरपालिका अथवा आर्किटेक्ट यांनी सुचविल्याप्रमाणे किंवा त्यांच्या आवश्यकतेनुसार इमारतीच्या नकाशात फ़ेरबदल करणे व ते फ़ेरबदल संमत करून घेणे, व त्यासाठी आवश्यक असणारा पत्रव्यवहार करणे.

३. सदर मिळकतीबाबत कल्याण डोंबिवली महानगरपालिका अथवा सक्षम प्राधिकारी यांचेकडे भरावा लागणारा कर/डेव्हलपमेंट चार्जेस तसेच ओपन लॅण्ड चार्जेस इ. पोटी रक्कम भरावी लागल्यास ती भरणे, बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र मिळवणे, त्याबाबत योग्य ती कारवाई पत्रव्यवहार करणे, भरलेल्या रक्कमेची पावती स्विकारणे, महानगरपालिकेकडून काही सुट मिळत असल्यास अथवा अतिरीक्त चटई क्षेत्र निर्देशांक तसेच हस्तांतरणीय विकास हक्क मिळत असल्यास तो मिळवणे स्विकारणे व त्यासाठी आवश्यक असणारी कामे करणे. सदर

क ल न - ४
दस्त क्र. ५१९५ /१९
८/२०

मिळकतीच्या विकासासाठी हस्तांतरणीय विकास हक्क मिळवणे, त्याबाबत योग्यते करार-मदार करणे, ते नोंदणीकृत करणे व इतर आवश्यकती सर्व कामे करणे.

४. सदर मिळकतीवर हस्तांतरणीय विकास हक्क वापरून बांधकाम करावयाचे असल्यास स्वखर्चाने योग्य तो हस्तांतरणीय विकास हक्क खरेदी करणे, तो महानगरपालिकेकडून सदर मिळकतीवर बांधावयाच्या नियोजित इमारतीच्या आराखड्यात समायोजीत करणे, तशी सुधारीत बांधकाम मंजूरी घेणे, त्याकरिता योग्य ते करार-मदार करणे, त्यावर सह्या करणे, तसेच सदर करार स्वखर्चाने योग्य त्या दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणीकृत करणे.

५. कोणत्याही सरकारी, निमसरकारी कार्यालयात विकासक यांनी भरलेल्या रक्कम, डिपॉझिटचा परतावा मिळणार असल्यास तो परत घेणे, त्याची पावती देणे.

६. तलाठी, तहसीलदार, प्रांत, जिल्हाधिकारी यांचे कार्यालयात सदर मिळकतीचे बाबतीत आवश्यक असणारे कागदपत्रे मिळण्यासाठी अर्ज करणे, फ़ी भरणे व संबधीत कागदपत्रे मिळविणे.

७. सदर मिळकतीचा सर्व्हे, डि.आय.एल.आर. किंवा टि.आय.एल.आर. कडून करून हद्दी कायम करणे व मोजणीचा नकाशा मिळविणे व त्यासाठी अर्ज करणे, फ़ि भरणे, फ़ॉर्म भरणे.

८. सदर मिळकती लगतच्या इतर मिळकती विकत अथवा विकसीत करण्यास घेऊन सदर मिळकती बरोबर एकत्रीतपणे विकसीत करणे व त्यासाठी आवश्यकती सर्व कामे करणे.

९. सदर मिळकतीत बांधल्या जाणा-या इमारतीला पाणी-पुरवठा करणेसाठी महानगरपालिकेकडे पाण्याचे कनेक्शन मिळण्यासाठी अर्ज करणे, त्यासाठी आवश्यक असणारी फ़ी भरणे.

१०. महाराष्ट्र राज्य विद्यूत वितरण कंपनी लि. यांचे संबधीत कार्यालयाशी विज मिटर मिळणेसाठी आणि/अथवा सबस्टेशन बांधण्यासाठी पत्रव्यवहार करणे, फ़ॉर्मस भरणे, अर्ज करणे, हमीपत्र देणे, त्यावर सह्या करणे, आवश्यक ती रक्कम फ़ी

क ल न - ४
दस्त क्र. ५११५ /१९
९/२०

डिपॉझिट विद्युत महामंडाळाकडे भरणे, त्याची पावती स्विकारणे तसेच त्यांचे मागणीनुसार आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्णता करणे.

११. आयकर कार्यालयातून कोणतेही प्रमाणपत्र मिळविणे आवश्यक असल्यास त्यासंबधीत कार्यालयात अर्ज करणे त्यांची फ़ी भरणे, आवश्यक कागदपत्रे दाखल करणे व आवश्यक प्रमाणपत्र मिळविणे.

१२. वरउल्लेखीत गोष्टीसाठी सर्व संबधीत सरकारी, निमसरकारी कार्यालयाकडे अर्ज, नकाशे, प्रतिज्ञापत्र, हमीपत्र, मान्यतापत्र, करारनामे इतर कागदपत्र दस्तांवर सह्या करणे व कल्याण डोंबिवली महानगरपालिका अथवा सक्षम प्राधिकारी यांचे संबधीत खात्यांच्या मागणीनुसार आवश्यकत्या गोष्टींची व कागदपत्रांची पुर्तता करणे.

१३. यदाकदाचित सदर मिळकत किंवा तिचा कोणताही भाग कल्याण डोंबिवली महानगरपालिका अथवा सक्षम प्राधिकारी अथवा सरकारी/निमसरकारी प्राधिकरणाने कोणत्याही सार्वजनिक कामासाठी आरक्षीत केल्यास अथवा त्यासाठी नोटीस काढल्यास त्यास हरकत घेणे, त्या कार्यवाहीस योग्य त्या न्यायालयात आव्हान देणे, अथवा आरक्षणाने बाधीत होत असलेला सदर मिळकतीचा भाग कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या लाभात हस्तांतरीत करणे, त्याचे नुकसान भरपाईपोटी मिळणारे चटई क्षेत्र निर्देशांक आणि/अथवा हस्तांतरणीय विकास हक्क स्विकारणे, त्याकरीता योग्य ते करार मदार करणे, त्यावर सह्या करणे, तसेच सदरचे करार स्वखर्चाने योग्य त्या दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणीकृत करणे, सदरहू आरक्षणाने बाधीत क्षेत्राचा चटई क्षेत्र निर्देशांक आणि/अथवा हस्तांतरणीय विकास हक्क सदर मिळकतीवर बांधावयाच्या नियोजीत इमारतीच्या आराखड्यात समायोजीत करणे, तशी सुधारीत बांधकाम मंजूरी घेणे.

१४. सदर मिळकतीबाबत कर, भाडे, धारा व अन्य कोणतीही रक्कम थकबाकी देण्याची बाकी असल्यास ती संबधीत खात्यांना अदा करणे व त्याची पावती स्विकारणे.

१५. सदर मिळकतीच्या विकासाबाबतसंदर्भात आवश्यक तज्ञ व्यक्तींची म्हणजेच वकील, सॉलिसीटर, आर्किटेक्ट, आर.सी.सी. कन्सलटन्ट, सिव्हील इंजिनिअर,